# गीत शिकणे

*ईशा सरदेसाई यांच्याद्वारे पुनर्लिखित*

रात्रीची वेळ होती आणि एक युवक उंच-उंच वाढलेल्या गवतातून चालत जात होता. गवताच्या एका बाजूला त्याच्या कुटुंबाचा तळ होता तर दुसऱ्या बाजूला दूरवर कुठेतरी पाण्याचा एक तलाव होता. त्या अंधारात चकाकणाऱ्या तलावाच्या निळसर-हिरव्या रंगाची ओझरती झलक त्याच्या दृष्टीस पडत होती.

थोड्या-थोड्या वेळानंतर, तो युवक थबकत होता, डोळे मिटत होता आणि गवताच्या पात्यांमधून शीळ घालीत जाणाऱ्या वाऱ्याचा संगीतमय नाद एकाग्रतेने ऐकत होता. *'सूंऽऽऽ-सूंऽऽऽ-सूंऽऽऽ,'* वारा म्हणत होता. आणि तो युवक विचार करत होता, "हे तेच आहे का? ते गीत?"

काही क्षणांसाठी तो हातांनी आपले डोळे बंद करून ठेवी, कारण त्याची अशी इच्छा होती की, त्याला समजेल असे काहीतरी वाऱ्याने त्याच्या कानांमध्ये कुजबुजावे : एखादा शब्द किंवा एखादी सुपरिचित सुरावट. *सूंऽऽऽ-सूंऽऽऽ-सूंऽऽऽ.* ओह, परंतु तिथे हाच एक आवाज होता, जो त्या युवकाला ऐकू येत होता.

तो युवक आणि त्याचे साथीदार या घनदाट बुशलँडमध्ये राहत होते, [तो वन्यप्रदेश जो झाडाझुडुपांनी आणि मोठमोठ्या वृक्षांनी झाकलेला असतो] जो अनेक शतकांनंतर ऑस्ट्रेलिया देश बनला. त्यांच्या या जगाची उत्पत्ती अतिशय दिव्य पद्धतीने झालेली होती, सृष्टिकर्त्या परमात्म्याच्या गीताने ते अस्तित्वात आले होते. आणि आता ज्यांच्याकडे प्रज्ञान होते ते विद्वान लोक हे गीत गात आणि ते गीत त्यांना जिकडे घेऊन जाईल, तिकडे त्या गीताच्या पाठोपाठ ते जात.

"हे, जगज्जननी," तो युवक वाऱ्याला अगदी हळू आवाजात म्हणाला. "मला तुझा मार्ग दाखव. तुझ्या गीताची धून मला ऐकव. मला ते जाणून घ्यायचे आहेत."

तो युवक चालतच राहिला. तो आता तलावाच्या नजिक येत होता. त्या तलावाची चमक त्याच्या सभोवतालच्या गर्द गवतातून आणि निलगिरीच्या झाडांमधूनही दृष्टीस पडत होती. त्याच्या पायांखालील जमीन कंपित होत होती, जणूकाही तिच्यातून एखादा प्रवाह लयबद्धतेने प्रवाहित होत होता. या कंपनांचा वेग अजुनच वाढला आहे असे भासत होते — आणि त्याबरोबरच वाराही वेगाने

वाहू लागला होता. गवतही तालबद्धतेने डोलत होते; त्याच्या या हालचालीत गोलाकार फिरण्याची आणि वळण्याची कला होती.

तो युवक तलावाच्या काठावर पोहोचला. खाली वाकून गुढग्यांवर बसत त्याने आपले नाक तलावाच्या काचसदृश, रत्नासमान पृष्ठभागाकडे नेले आणि तो तलावाच्या अंतरंगात एकटक पाहू लागला. आणि तेव्हा त्याला ते ऐकू आले : सुरवातीला अगदी मंदपणे, आणि लगोलगच मोठ्याने आणि मग तीव्रतेने. एक स्वर — दोन स्वर — एक ताल, एक धून.

त्या युवकाने विस्मयाने वर पाहिले. मंद वाऱ्याच्या झुळुकेने जवळपासच्या फुलांच्या छोट्याशा पाकळ्यांना स्वतःबरोबर वाहून आणले होते, आणि आता त्या पाकळ्यांनी त्याच्या सभोवार फेर धरला होता. त्या पाकळ्या गीताच्या सूरांसह नृत्य करत होत्या आणि त्या सूराला पुढे जाण्यास प्रेरित करत होत्या. त्या संगीतात तो त्याच्या पूर्वजांची हाक ऐकू शकत होता. त्या संगीतात तो धरतीचा मंद ध्वनी आणि आकाशाची गर्जनाही ऐकू शकत होता. या संगीतात तो 'त्याचा' आवाज ऐकू शकत होता ज्याने या भव्य जगताची रचना केली होती.

त्या पाण्यावर पुन्हा एकदा वाकताच त्या गीताने त्याला सर्व बाजूंनी आलिंगन दिले. त्याच्या डोळ्यांतून अश्रू ठिबकले. हे आवाज अतिशय सुंदर होते, सुरुवातीलाच त्याला ते अलौकिक आणि सुपरिचित वाटले; त्या आवाजांनी त्याच्या अंतरात जागवलेल्या भावनेला जर का तो एखाद्या नावाने संबोधित करू शकला असता, तर ते नाव असते, *घर.*

नव्यानेच गवसलेल्या अशा या भावनेमुळे अचंबित झालेल्या त्याला त्याचवेळी आणखी एक गोंधळ ऐकू आला. *कुऽऽऽर्, कुऽऽऽर्.* तो कुणाच्या तरी पावलांचा आणि त्या पायांखाली दबणाऱ्या झुडुपांच्या आणि डहाळ्यांच्या सळसळीचा आवाज वाटत होता. चांदीसारख्या पांढऱ्या दाढीची एक झलक त्याला तिथे दिसली.

तो पाठीमागे वळला तेव्हा त्याच्याच कुळातील एक वयस्कर व्यक्ती त्याच्या शेजारी उभी असल्याचे आढळून आले. त्या व्यक्तीच्या चेहऱ्याचा रंग सावळा होता — आणि त्या रापलेल्या चेहऱ्यावर सुरकुत्या होत्या ज्या मऊशार चामड्यासमान होत्या. त्यांचा चेहरा त्याच पांढऱ्या दाढीने झाकलेला होता. त्यांच्या डोळ्यांत करुणा होती.

"तू ते ऐकलेस का, बेटा?" त्यांनी त्या युवकाला विचारले. "ते गीत?"

“होय!” तो युवक हळूच म्हणाला, त्याच्या आवाजात आनंद झळकत होता. “आजोबा, ते गीत तुम्हालादेखील ऐकू येते का?” मोठ्यांचा मान राखण्यासाठी उपयोगात आणल्या जाणाऱ्या संबोधनाचा वापर करत त्याने विचारले.

“होय, मीदेखील निश्चितच ते ऐकू शकतो,” ते वृद्ध आजोबा म्हणाले. “आणि मला ते गातादेखील येते. ये इकडे.”

ते वृद्ध आजोबा तलावाच्या काठावरून चालू लागले आणि पुढे गेल्यावर पलीकडेच असलेल्या गवतात दिसेनासे झाले. तो युवक विस्फारलेल्या डोळ्यांनी त्यांच्याकडे पाहत राहिला आणि मग वेगाने त्यांच्या मागोमाग जायला निघाला.

ते वृद्ध आजोबा अतिशय मृदुलतेने एक सौम्य, लयबद्ध धून गात होते. जेव्हा ते त्या गीतातील विशिष्ट ओळीवर पोहोचत, तेव्हा एकाएकी ते थोड्या वरच्या स्वरात गाऊ लागत — डावीकडे, उजवीकडे, गीत त्यांना जसे निर्देशित करेल त्याप्रमाणे. काही वेळ ते अशा प्रकारे पुढे जात राहिले आणि तो युवक त्यांच्या बरोबरीने चालत राहण्यासाठी त्यांच्या मागोमाग पळत जात होता. शेवटी ते वृक्षांच्या सालीपासून बनवलेल्या एका छोट्याशा झोपडीजवळ आले. त्या झोपडीसमोर शेकोटी पेटलेली होती.

“ये इकडे,” ते वृद्ध आजोबा पुन्हा म्हणाले. “तुला भूक लागली असेल ना? माझी पत्नी जेवण बनवते आहे.”

ते त्या शेकोटीजवळ बसले; त्या झोपडीतून एक महिला बाहेर आली आणि तिने शेकोटीतील कोळसे काठीने हलवले; तिचाही वर्ण सावळा होता आणि केस पांढरे होते.

“तर मग — तू गीत ऐकलेस वाटत?” तिने त्या युवकाला विचारले. तिने कोळश्यांमधून एक मोठा बिया लावलेला ब्रेडचा तुकडा ओढून काढला आणि त्या युवकासमोर ठेवला.

“होय अम्मा, मी ते ऐकले,” युवक उत्तेजित होत उत्तरला. जे घडले होते त्याची परत आठवण करत असतानाच त्याच्या तोंडून एकाएकी शब्द बाहेर पडले. “ते *विस्मयकारी* होते!” तो म्हणाला. “मी जगज्जननीची खरोखरच *अतिशय* मनापासून आराधना करत होतो. मी म्हणत होतो, *हे जगज्जननी, तुझे गीत मला ऐकव.* आणि मग हा तलाव माझ्या दृष्टीस पडला, जो *झगमगत* होता. आणि मग — आणि मग — ” त्यापुढे जे घडले होते त्याची आठवण होताच त्या युवकाचे डोळे पाणावले. “सर्वात मधुर संगीत — आणि ते गवत, ती फुले आणि सर्वकाही नृत्य करत होते. . . ”

“ते गीत पुन्हा ऐकण्यासाठी मी उतावीळ झालो आहे,” अखेरीस तो म्हणाला.

“होय, — आणि तू ते नक्कीच ऐकशील,” ती वृद्ध स्त्री म्हणाली, ती शांतपणे स्मितहास्य करत होती. “आत्तासाठी, तू तुझा अभ्यास करायला सुरुवात कर.”

तो युवक, ज्याने स्वतःच्या दातांनी ब्रेडचा एक मोठा तुकडा तोडलाच होता, तिचे शब्द ऐकताच थांबला. त्याचे तोंड ब्रेडने पूर्ण भरलेले होते.

*“अभ्यास?”* घाईघाईने घास गिळत त्याने विचारले.

“होय, का?,” ती महिला म्हणाली. “तुला जर ते पुन्हा एकदा अनुभवायचे असेल आणि इतरांना मार्गदर्शन करण्यासाठी तुला जर त्या गीताचा वापर करायचा असेल — जसे वृद्ध आजोबांनी तुला आज संध्याकाळी दाखवले — तर तुला ते गीत शिकावे लागेल.”

“आणि तुला त्याचा अभ्यास करावा लागेल,” ते वृद्ध आजोबा म्हणाले.

“पण — का?” त्या युवकाने विचारले. “मी ते गीत ऐकले आहे. आणि मी ते विसरणार नाही.”

“होय, ते विसरण्याची *योजना* कुणीही बनवत नाही,” ते वृद्ध आजोबा सौम्यपणे म्हणाले.

“अगदी खरे आहे,” तो युवक म्हणाला. “आणि मी तरी ते कधीच विसरणार नाही. कारण जगज्जननी आणि मी — आमच्यात एक बंध आहे.”

“होय, तुमच्यात *बंध* आहे. पण त्याचा अर्थ असा होत नाही की, तू अभ्यास करू नयेस.”

त्या युवकाने आपले नाक चोळायला सुरुवात केली. त्याला ती कल्पना फारशी रूचली नव्हती. नाचणाऱ्या फुलांचे काय? आणि डोलणारे गवत? अभ्यास न करताच त्याला पुन्हापुन्हा त्या गोष्टींचा अनुभव घ्यायचा होते.

“कदाचित इतर लोकांना अभ्यास करावा लागत असेल, आजोबा,” त्याने सांगून टाकले. “पण मला नाही. पाहाच तुम्ही.”

त्या वृद्ध आजोबांनी युवकाच्या डोळ्यांत खोलवर पाहिले. ते क्षणभर काहीच बोलले नाही.

मग त्यांनी एक दीर्घ श्वास घेतला, स्वतःच्या मांडीवर थोपटले आणि ते उभे राहिले. "खूप छान, बेटा. तर मग, तुझ्यासाठी कुठलाही अभ्यास नाही. पण आता बराच उशीर झाला आहे म्हणून तू आज रात्रभर इथेच राहा. उद्या तू त्या गीताचे अनुसरण करत घरी परत जाऊ शकतोस."

कमीत कमी या गोष्टीसाठी मात्र तो युवक तयार झाला.

***

दुसऱ्या दिवसाचा सूर्योदय अत्यंत आल्हाददायक होता; सोनेरी-नारिंगी प्रकाश त्या संपूर्ण प्रदेशावर पसरला होता. या प्रकाशाची किरणे त्या झोपडीत प्रवेशताच तो युवक झोपेतून जागा झाला.

जांभई देत उठून बसत त्याने हात पसरून आळोखेपिळोखे दिले.

"हूँऽऽ. . ." त्याने विचार केला. "घरी परत जाण्याआधी मला थोडा नाश्ता मिळाला तर बरे होईल."

झोपडीच्या बाहेर तो इकडेतिकडे भटकत राहिला. शेकोटी पुन्हा धगधगली होती आणि ते वयस्क पतीपत्नी त्याजवळ बसलेले होते. त्याला पाहिल्यावर ते दोघे हसले आणि त्यांनी खूणेनेच त्याला खाली बसण्यास सुचवले.

आपले हात एकमेकांवर चोळत तो त्यांच्या शेजारी जाऊन बसला. तिथे सर्वत्र शांतता होती, फक्त अधूनमधून शेकोटीतून ज्वाळांचा फट्-फट् असा आवाज येत होता. सूर्योदय होऊ लागला होता.

नाश्त्याच्या व्यवस्थेचा अंदाज घेण्यासाठी त्याने आजुबाजूला दृष्टी फिरवली. कदाचित अधिक काही ब्रेड किंवा भाजलेल्या काही भाज्या. पण — तिथे कुठलाच पदार्थ शिजताना त्याला दिसून आला नाही. त्याने आपली नजर त्या आजीआजोबांवर टाकली. *त्यांचे आधीच खाऊन झाले असेल का?*

त्यांचे चेहरे निर्विकार होते.

म्हणून त्या युवकाने पुन्हा शेकोटीकडे पाहावयास सुरुवात केली आणि तिघेहीजण शांतपणे तिथे बसून राहिले. त्याच्या पोटात कावळे कोकलू लागले होते. तो पुन्हापुन्हा त्या आजीआजोबांकडे पाहत होता. त्याला आशा होती की, ते त्याला *काहीतरी* खायला देतील — कोणताही पदार्थ किंवा एक किंवा दोन बेरीज्. परंतु ते मात्र त्याच्याकडे पाहून फक्त शांतपणे स्मितहास्य करत होते.

हे असेच काही वेळ सुरू राहिले, मग मात्र त्याला राहावले नाही. "अम्मा, आजोबा," तो अभावितपणे बोलला. "कृपया — आत्ता आपण काही खाणार आहोत का?"

त्या वयस्क आजीआजोबांनी त्याच्याकडे पाहिले. सकाळच्या प्रकाशात तो त्यांच्या चेहऱ्यांवरील सुरकुत्या अजुनच स्पष्टपणे पाहू शकत होता, की कशा रितीने त्या आत बाहेर आणि उभ्याआडव्या एकमेकांत मिसळल्या गेल्या होत्या.

"तुला काय म्हणायचे आहे, बेटा?" त्या वृद्ध आजोबांनी विचारले.

"मला म्हणायचे आहे की, आजच्या सकाळी आपण नाश्ता करणार आहोत का?"

त्या वृद्ध आजोबांच्या चेहऱ्यावर आश्चर्याचे भाव पसरले. "पण आपल्याला नाश्ता करण्याची गरजच काय आहे?"

"कारण, आपल्याला — आपल्याला नाश्ता तर करावाच *लागतो* ना," तो युवक म्हणाला. त्या वृद्ध आजोबांच्या प्रश्नाने तो पार गोंधळून गेला होता.

"पण आपण काल रात्रीच तर खाल्ले होते ना," ते वृद्ध आजोबा म्हणाले.

युवकाने जे ऐकले त्यावर त्याचा विश्वासच बसत नव्हता!

"काल रात्री आपण जेवण केले होते याचा असा अर्थ होत नाही की, आपण आज सकाळी नाश्ता करणार नाही!" युवक म्हणाला.

"हूँऽऽ. . ." ते वृद्ध आजोबा म्हणाले. "हे बघ, मला वाटले की काल रात्री आपण जेवण केले होते म्हणून तुला पुन्हा खायची गरज पडणार नाही. कारण ते एक वेळचे जेवण नक्कीच पुरेसे होते."

तो युवक हसू लागला. "अर्थातच मला पुन्हा खावेच लागेल! नाहीतर घरी परत जाण्यासाठी माझ्यात ताकद कशी येणार?"

एखाद्या व्यक्तीला खरेतर दिवसातून *तीनदा* जेवण घेणे कसे आवश्यक असते याविषयी तो युवक पुढे काही बोलणार, तोच त्याला त्या वृद्ध आजोबांच्या डोळ्यांत काहीतरी दृष्टीस पडले. आणि त्यांच्या चेहऱ्यावरील रेषांमध्ये — ती त्या युवकाच्या मनातील कल्पना होती का, की त्या रेषा आत्ता अधिक स्पष्ट झाल्या होत्या? जणूकाही त्याच्यासमोर त्या गीतांचे प्रज्ञान प्रकट केले जात असावे, त्या व्यक्तीच्या त्वचेवर सत्याचा नकाशा कोरलेला होता.

"ओह," युवक शांतपणे म्हणाला.

"होय ना?" त्या वृद्ध आजोबांनी विचारले.

“होय,” युवक म्हणाला. “हे अगोदरच माझ्या लक्षात कसे आले नाही? यासाठी कृपया मला क्षमा करा. मी आता तयार आहे — अभ्यास करण्यासाठी.”

© २०१९ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.